# "आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणासंदर्भात धार्मिक सुधारणांचे महत्व (1818–1960)"

**("Importance of Religious Reform in Modern Maharashtra with Special Reference to Women's Reform (1818-1960)")**

## लघुशोध प्रबंध गोषवारा

## (Executive Summary of Minor Research Project)


**अंबादास ओंकार बाकरे**

सहाय्यक प्राध्यापक,(इतिहास विभाग)

न. भा. द. महाविद्यालय, गोंदिया

ambadas_bakre@rediffmail.com



http://www.nmdcgondia.org/mrpfile/Prof._Ambadas_Bakre.pdf

# Executive Summary of Minor Research Project

## (लघुशोध प्रबंध गोषवारा)

### "आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणासंदर्भात धार्मिक सुधारणांचे महत्व (1818–1960)"

"न स्त्री स्वतंत्रती मर्हती" या स्त्री दास्यत्वाच्या सिद्धाकंनाने स्त्री जीवनाची शास्त्रीय आणि व्यावहारीक बाजू धर्मशास्त्राच्या माध्यमातून टिकवून ठेवली. ज्यामुळे भारतात ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेपर्यंत 'स्त्री दास्यत्व' सामाजिक जिवनाचा अविभाज्य घटक बनून राहिला. स्त्रीचे व्यक्तिगत आणि सार्वजनिक अस्तित्व हया सिद्धांकनाने पुर्णतः नाकारले, त्यामुळे भारतीय स्त्री हा 19व्या शतकापर्यंत सामाजिक जीवनाचा स्वतंत्र घटक बनू शकला नाही. 19 व्या शतकाच्या पुर्वार्धात भारतात उदयास आलेल्या 'आधुनिकतेच्या' विचारधारेने विवेकवाद, मानवतावाद, बुद्धीवाद, आणि तर्कवाद या प्रबोधन तत्वांची ओळख भारतीय समाजाला झाली. सामाजिक जिवनाचा अविभाज्य घटक या नात्याने आणि व्यक्ती वादाच्या तत्वाने प्रथमच स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव या कालखंडात उदयास येऊ घातलेल्या मध्यम वर्गाला होऊ लागली. ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेची मिमांसा करतांना भारतीय समाजातील दोषांची जाणीव त्यांना होऊ लागली. धर्मपरंपरा आणि सामाजिक व्यवस्था यातील अंतर्विरोधाची चर्चा हा वर्ग करू लागला. त्यातून त्यांना असे दिसून आले की, धर्मशास्त्रातंर्गत असणा–या तथाकथित विचारांमुळे भारतीय समाज एकरूप होऊ शकला नाही. परंपरांचे विभत्स रूप हिंदू धर्मातंर्गत विकसित पावल्याने या समाजाच्या उन्नतीचे सर्व मार्ग अवरूद्ध झाले. 'स्त्री दास्यत्व' हे या विभत्स परंपरांचेच एक प्रतिक असल्याची धारणा मध्यम वर्गाची झाली. त्यामुळे जोपर्यंत धर्माच्या क्षेत्रात बदलांच्या वा–याचा शिरकाव होत नाही तोपर्यंत भारतीय समाज आधुनिकतेच्या कुशीत प्रवेशित होणार नाही हया तर्कानुमानाच्या आधारावर सुधारकांनी धार्मिक सुधारणांसाठी सामाजिक व्यवस्थेतील स्त्री या सर्वाधिक प्रभावित घटकाच्या 'चर्चा आणि सुधारणा' करण्यावर भर दिला. हेच त्यांच्या चर्चा विश्वाचे मध्यवर्ती माध्यम बनले.

वस्तुतः 21 व्या शतकाच्या उंबरठयावर पाऊल ठेवत असतांना 'भारतीय स्त्री अधिक शिक्षित बनत जात असली तरी तिचा व्यावहारिक आचारधर्म धर्मकेंद्रित असल्याचे वारंवार जाणवते. त्यामुळे महिला सक्षमीकरणाची चर्चा करतांना हया चळवळीच्या कार्यपदधतीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. या आधारावर हया संशोधनाची मुख्य दृष्टी निश्चित करण्यात आली असून 19–20 व्या शतकात उदयास आलेल्या धर्म सुधारणा चळवळीचा स्त्री जीवनाच्या धर्माचारावर पडलेला प्रभाव त्याचे सामाजिक जीवनातील स्थान आणि स्त्री जीवनात घडून आलेले बदल यांची चर्चा करण्याचा प्रयत्न या लघू शोध प्रबंधात केला आहे.

ही चर्चा खालीलप्रमाणे प्रकरणानुरूप लघुशोध प्रबंधात केली आहे.

http://www.nmdcgondia.org/mrpfile/Prof._Ambadas_Bakre.pdf

**प्रकरण 1. – प्रस्तावना**

या प्रकरणात युरोपात घडून आलेल्या प्रबोधन पर्वाचा जन्म भारतात कसा झाला याची चर्चा केली आहे. भारताच्या गुलामगिरी मानसिकतेची चर्चा करतांना कोणकोणत्या संरचनाचा स्विकार करावा ही विवंचना आणि त्याला मध्यम वर्गाने दिलेला प्रतिसाद, ज्यामुळे भारतात आधुनिक युगाचा उषःकाल झाला. या प्रबोधनविषयक विचारांच्या जडणघडणीची मांडणी विविध अभ्यासकांच्या मतांच्या आधारावर केली. याच प्रकरणाच्या दुस–या भागात विषयाचे अवलोकन या उपशिर्षकांतर्गत सुधारणा चळवळीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या संशोधनात्मक संदर्भाची चर्चा केली आहे. ज्यामध्ये बहूतेक सर्वच अभ्यासकांनी सुधारणा चळवळीच्या पार्श्वभुमीवर घडून आलेल्या बदलामुळे स्त्रियांचे समाजातील स्थान काय राहीले याची चर्चा केली आहे.

**प्रकरण 2– महाराष्ट्र : समाज आणि संस्कृती**

या प्रकरणात महाराष्ट्राच्या भौगोलिक, सामाजिक, व धार्मिक जीवन शैलीची चर्चा करण्यात आली आहे. सहयाद्री, व सातपुडा पर्वत रांगाच्या कुशीत विकसित झालेल्या महाराष्ट्रीय समाजाची जडणघडण या समाजाचे वेगळेपण दर्शविते. असे असले तरी राजकीय सत्ताकारणाच्या पृष्ठभूमीतून महाराष्ट्रीय समाजावर 'पुराण संस्कृतीचा' मोठा प्रभाव पडला. विशेषतः दहाव्या शतकानंतर महाराष्ट्रात उदयास आलेल्या भागवत धर्माने वैदिक धर्माच्या तात्वीक बाबींना नाकारण्यावर भर दिला. विशेषतः वारकरी संप्रदायाने हिंदू धर्मातंर्गत असणा–या 'आत्मा परमात्मा' संकल्पनांची पुर्नव्याख्या करून धर्माची व्यावहारीक बाजू मांडण्यावर भर दिला. ज्यामुळे भारतातील अन्य प्रांताच्या तुलनेत महाराष्ट्रीय समाज वैदिक धर्माच्या अधिक आहारी जाऊ शकला नाही.

**प्रकरण 3. 19 वे शतक परिवर्तन कालखंडाचा उदय**

या प्रकरणात, 19 व्या शतकातील सामाजिक जीवनाची विशेषतः स्त्री जीवनाची चर्चा करून त्याला मध्यम वर्गाने दिलेला प्रतिसाद याची मांडणी केली आहे. स्त्री या रूढी–परंपरांच्या आचार धर्माचा मध्यमवर्ती बिंदू बनला, तर जातिव्यवस्था त्याच्या नियमनाचे सुत्र बनले, 'प्रजोत्पादन प्रक्रियेतील महत्वाचा घटक' या नात्याने स्त्रीला काही अंशी सामाजिक दर्जा प्राप्त झाला असला तरी पावित्र्याच्या चौकटीतून तिचे परावलंबित्व पुरूष केंद्री करण्यात आले होते. स्त्री जिवनाच्या हया बहूआयामी शोषणात्मक संरचनाची चर्चा या काळात उदयास आलेल्या प्रबोधन विचारांनी तुलनात्मक संरचनेत करण्यात सुरवात केली. या वर्गाने सुधारणांची चर्चा 'पाश्चात्य विचारांच्या आधारावर भारतीय पृष्ठभुमीच्या पटलावर' केली. सुधारणावादाच्या प्रकीयेत येणा–या सर्व सुधारकांच्या लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णूशास्त्री पंडीत, महात्मा फुले, न्यायमुर्ती रानडे, डॉ. रा.गो. भांडारकर, गो.ग. आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मसुधारणाविषयक विचारांचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

http://www.nmdcgondia.org/mrpfile/Prof._Ambadas_Bakre.pdf

**प्रकरण 4. – स्त्री विषयक सुधारणावादी विचारधारा**

या प्रकरणांत सुधारकांची बालविवाह, केशवपन, बाल–जरठ विवाह, विधवापन, सतीप्रथा, विधवा पुनर्विवाह, देशवासी या स्त्री संदर्भात असणा–या धर्मकेंद्रित विचारांची चिंतनात्मक दृष्टीबाबत चर्चा करून त्या संदर्भात केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. या कालखंडातील सर्वच सुधारकांनी उपरोक्त प्रथा परंपराच्या समाप्तीसाठी स्त्री शिक्षण या रामबाण उपायाची मांडणी करून स्त्री शिक्षणाचा कृतीशील विचार मांडला. ज्याचा परिणाम 20 व्या शतकातील स्त्रीविषयक चळवळीच्या उदयात दिसून आला.

**प्रकरण 5. स्त्रीविषयक सुधारणावादाचा महाराष्ट्रीय समाजावर पडलेला प्रभाव**

या प्रकरणात महाराष्ट्रात घडून आलेल्या धर्म सुधारणा चळवळीचा स्त्रीच्या व्यावहारिक जिवनावर पडलेल्या प्रभावाची चर्चा करण्यात आली आहे. स्त्री हक्कांसाठी स्त्रियांनी उभ्या केलेल्या चळवळींची मांडणी करून त्यामुळे स्त्रियांच्या भावविश्वात घडून आलेल्या बदलांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेषतः स्त्रीशिक्षण, विधवाप्रश्न, अर्थाजन, धार्मिक व घटनात्मक बाजू, स्त्री वर्गाची आत्मनिर्भरता या संबंधाने स्त्री वर्गाने केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण 6. – उपसंहार**

या प्रकरणात धर्म सुधारणा चळवळीच्या कार्याचे मुल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. या चळवळीच्या उदयामुळे हिंदू धर्माकडे बघण्याच्या स्त्री वर्गाच्या दृष्टीकोनाचा आढावा घेतला आहे. शिक्षणामुळे स्त्रियांच्या धर्मचारण धारणेत बदल घडून आले. तसेच 20 व्या शतकात स्त्री जीवनात घडून आलेल्या बदलांची, स्त्रीच्या सार्वजनिक क्षेत्रातील कार्याची दखल पितृसत्ताक व्यवस्थेला घ्यावी लागली हे दिसून येते.

संशोधक,

**अंबादास ओंकार बाकरे**

सहाय्यक प्राध्यापक,(इतिहास विभाग)

न. मा. द. महाविद्यालय, गोंदिया

ambadas_bakre@rediffmail.com

प्राचार्य,

न. मा. द. महाविद्यालय, गोंदिया

प्राचार्य

न. मा. द. महाविद्यालय

गोंदिया

http://www.nmdcgondia.org/mrpfile/Prof._Ambadas_Bakre.pdf